# रोहयोच्या अमलबजावणीत लोकचळवळींचे योगदान

**शाजी जोसेफ**

*रोहयोच्या अमलबजावणीत जनआंदोलनांनी वठवलेली भूमिका अनन्य महत्त्वाची होती. 'बिगर-पक्षीय राजकीय संघटना' म्हणून नामांकरण झालेल्या या राजकीय प्रक्रियेने दारिद्र्य निवारण विकास प्रक्रियेत रोजगाराचा हक्क तर केंद्रभागी आणलाच, सोबत प्रस्थापित सामाजिक सत्तासंबंधांविरुद्ध जनसंघर्ष उभारून ग्रामीण दुर्बळांच्या सबलीकरणास चालना दिली. रोहयोसंदर्भात लोकचळवळींच्या वरील योगदानाचा आढावा घेताना, त्यांच्या उत्कर्षाचा व अपकर्षाचा काळ पाच निवडक जनसंघटनांच्या आधारे या निबंधात रेखाटला आहे.*

### प्रस्तावना

महाराष्ट्रात राज्यातील इतर दारिद्र्य निवारण कार्यक्रमांच्या तुलनेत रोज़गार हमी योजना (रोहयो) सुरू होण्यात जनआंदोलनांचा सहभाग अधिक होता. १९७०-८०च्या दरम्यान ग्रामीण श्रमिकांना संघटित करणाऱ्या अनेक संघटनांचा उदय झाला, ज्यांची रोहयोची अमलबजावणी होण्यात आणि त्याला कायदेशीर पातळीवर मान्यता मिळण्यात महत्त्वाची भूमिका होती. या संघटनांनी रोहयोच्या निमित्ताने सीमांत गटांच्या प्रती होणाऱ्या भेदभावाचे व दारिद्र्याचे प्रश्न ऐरणीवर आणले. १९८१ मध्ये या सर्व संघटनांनी एकत्र येऊन 'रोजगार हमी योजना कामगारांची समन्वय समिती'ची स्थापना केली.

या संदर्भात दोन प्रश्न प्रामुख्याने समोर येतात. पहिला, शासकीय धोरणांत बदल आणण्यासाठी ग्रामीण श्रमिकांना संघटित करण्यास वरील संघटनांना प्रेरित करणारे घटक कोणते? दुसरा, रोहयोचा या आंदोलनात्मक स्वरूपावर कोणता परिणाम झाला? हे प्रश्न उकलण्यासाठी या निबंधात रोहयोची मागणी व त्याच्या स्वरूपाची पुनर्मांडणी करण्यात अग्रभागी असलेल्या पाच जनसंघटनांचे तपशीलवार परिशीलन केले आहे. महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद, युवक क्रांती दल (युक्रांद), श्रमिक संघटना, कष्टकरी संघटना व श्रमजीवी संघटना या त्या संघटना होत. या जनसंघटनांचे प्राधान्यक्रम कृतीत उतरवण्यासाठी रोहयो कशा प्रकारे मदतकारक ठरली व १९८०च्या दशकाच्या अखेरीस हे आंदोलनात्मक स्वरूप ओहोटीस लागण्यामागील कारणं कोणती, याचे येथे परीक्षण केले आहे.

सामाजिक बदलासाठी कार्यरत असलेल्या या गटांचे अस्तित्व ना रोहयोपासून सुरू झाले ना तेथेच संपले. रोहयोपूर्वी अस्तित्वात असलेले गट जमीन वाटप, ग्रामीण गरीबी व रोजगारविषयीच्या मुद्यांवर क्रियाशील होते. रोहयो कायद्यानंतर अस्तित्वात आलेल्या संघटना वेठबिगारी व असंघटित कामगारांबाबत कृतीशील होत्या.

रोहयो संदर्भातील आंदोलनाचा इतिहास दोन कालखंडात विभागता येईल. १९७८ पर्यंतच्या पहिल्या खंडात सरकारने रोजगार हमीचे तत्त्व स्वीकारावे व रोहयो कायद्यात कामगाराभिमुख तरतुदींचा समावेश असावा, यासाठी संबंधित संघटनांनी मोहीम काढली. १९७८ नंतरच्या कालखंडात रोहयो कायद्याची योग्य अमलबजावणी व्हावी व बदलत्या परिस्थितीनुसार [कायद्यातील] काही तरतुदींमध्ये बदल घडवून आणण्यावर भर देण्यात आला. पहिल्या कालखंडात राज्य शेतमजूर परिषद, युक्रांद व श्रमिक संघटना, तर दुसऱ्या कालखंडात कष्टकरी संघटना व श्रमजीवी संघटना रोहयोबाबत अधिक क्रियाशील होत्या.

१९६०च्या उत्तरार्धात अनेक चळवळींचा उद्‌भव आढळतो. अभ्यासकांनी या नवीन राजकीय कृतीशीलतेला 'बिगर-पक्षीय राजकीय संघटना' (Non-Party Political Formations -- NPPFs) [कोठारी १९८९], 'तृणमूल उपक्रमशीलता' किंवा 'परिवर्तनाचे नवीन सारथी' [सेठ १९८४] म्हणून संबोधिले. निवडणुकीच्या राजकारणाबद्दल घोर साशंकता व शासकीय विकास धोरणाबद्दलच्या टीकात्मक दृष्टिकोनातून या गटांची वाढ झाली होती. हे वरील नामाभिधानांमागील समान सूत्र होते.

कोठारी (१९८९), सेठ (१९८४) व सेठी (१९८४) यांच्या मतं NPPFsची काही समान लक्षणं खालीलप्रमाणे आहेत: १) पक्षीय राजकारणाबाहेर राहून, लोकशाही हक्कांसाठी 'लोकांच्या उठावामार्फत प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणे. २) जरी ह्या चळवळी अधिककरून स्वायत्त होत्या तरी लाल निशाण पक्ष व समाजवादी पक्ष यांसारख्या जहाल व सीमांत राजकीय पक्षांशी त्या निगडित होत्या. ३) त्यांची आंदोलनं जरी सीमित व स्थानिक प्रश्नांवर केंद्रित होती तरी सार्वजनिक मत्तांद्वारे दारिद्र्य निवारण साधण्याच्या तत्कालीन भूमिकांना प्रभावित करून, 'सार्वजनिक मत्तां'चा अर्थ अधिक व्यापक करण्यात त्यांचे कळीचे योगदान राहिले, ४) ह्या गटांनी दारिद्र्याकडे केवळ आर्थिक विषमता म्हणून न पाहता, गरिबांच्या एकूण सामाजिक सत्तासंबंधाची निष्पत्ती म्हणून पाहिले; म्हणूनच, जमीनधारणा व जमीन सुधारणा यासारखे भौतिक प्रश्न त्यांनी उपस्थित केले; तसेच केवळ आर्थिक शोषण गरिबीला कारणीभूत आहे असे न मानल्यामुळे त्यांनी आदिवासी व दलित अस्मितांसंबंधी ज्वलंत सांस्कृतिक व सामाजिक पेच उपस्थित केले. ५) खासकरून रोहयोसंबंधी काम करणाऱ्या गटांची समन्वय समिती

स्थापण्यात आली, ६) NPPFsचे नेतृत्व उच्च व मध्यम जातीतील व वर्गातील होते व ते अधिककरून शहरी होते, ७) कालौघात, या गटांच्या काही नेत्यांनी कार्याचे संस्थात्मकीकरण करून चळवळींचे संस्थांत (NGOs) रूपांतर केले.

वरील पैलू या निबंधात अवलोकनार्थ घेतलेल्या पाच संघटनांना अधिककरून लागू होतात. या संघटनांच्या उत्क्रांतीचा इतिहास रेखाटताना संघटना व सरकारी कार्यक्रम यांच्या परस्पर संबंधात सरकारी कार्यक्रम संघटनात्मक कृतीशीलतेला किती प्रमाणात वाव देतात वा त्यावर लगाम घालतात, याचा मी तपास घेतला आहे.'

## महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद

अवर्षणाविरुद्ध ग्रामीण गरीबांना संघटित करण्याच्या हेतूने १९७१मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात दत्ता देशमुखांसारख्या लाल निशाण पक्षाच्या (LNP) नेत्यांनी या पक्षाशी निगडित अशी 'महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद' (यापुढे, परिषद) नावाची ग्रामीण कामगार संघटना स्थापन केली. तरीही, परिषद व LNP व्यूहरचनात्मक कारणांसाठी एकमेकांपासून अंतर ठेवत. परिषद ग्रामीण श्रमिकांचे संघटन करण्यावर भर देई व LNPच्या निवडणुकीच्या राजकारणापासून अलिप्त राही. तथापि, LNPच्या ग्रामीण व शहरी कामगार संघटनांच्या एकात्मीकरणाच्या उद्दिष्टाला साहाय्यभूत ठरेल असाच परिषदेचा ग्रामीण आधार होता. उदा. जानेवारी १९७१ मध्ये शहरी कामगारांच्या मदतीने 'आला रे आला शेतकरी आला' या घोषणेभोवती २५ हजार ग्रामीण श्रमिकांचे परिषदेने मुंबईत निदर्शन भरविले. (*ग्रामीण शेतकरी*, फेब्रुवारी १, १९७२).

मी दोन स्तरांवर परिषदेचे (रोहयोसंदर्भातील) योगदान तपासले आहे — एक, रोहयो सुरू करण्यात व दोन, रोहयो कायद्यातील तरतुदींची अमलबजावणी करण्याकरता ग्रामीण गरिबांचे संघटीकरण करण्यात परिषदेची भूमिका तपासली आहे. आपल्या मागण्या मांडण्यासाठी परिषदेने निदर्शने, संप, रस्ता रोको, घेराव, धरणे, मोर्चे, उपोषणे व सरकारकडे अर्जविनंत्या व प्रतिनिधी मंडळ धाडणे यांसारख्या अनेक दबाव तंत्रांचा वापर केला. मार्च १९७१ मध्ये, परिषदेतर्फे महाराष्ट्रातून आलेल्या एक लाख ग्रामीण श्रमिकांचे निदर्शन झाली तर मे १९७१मध्ये वेतनाच्या अनियमित देयाबद्दल अवर्षणग्रस्त श्रमिकांना परिषदेने संघटित केले. दुष्काळ निवारणाच्या उपक्रमांची व्याप्ती वाढवण्यासाठी सरकारवर दबाव आणून परिषदेच्या अनेक मागण्या मान्य करण्यास सरकारला भाग पाडले. यामुळे १९७१ पासून परिषदेचा लोकाधार वाढला. जेव्हा सरकार ग्रामीण श्रमिकांना वेतन देण्यात असमर्थ ठरले तेव्हा परिषदेने मुंबई-पुण्यातील औद्योगिक कामगारांकडून ४० लाख रुपये जमा केले. शहरी जनता ग्रामीण गरिबांना आधार देऊ शकते, या प्रत्ययाधारे शहरी व्यवसायिकांवर कर लादून रोहयोसाठी उत्पन्नाचा स्रोत निर्माण करावा, अशी मागणी नंतर परिषदेने केली.

अवर्षणप्रवण भागांमध्ये रेशनिंग पुरवणे, दुष्काळ निवारण केंद्रांवरती वेळेवर किमान वेतनाच्या अमलबजावणीसाठी शोध समिती स्थापणे, काळाबाजार व भाववाढ रोखणे, गरिबांचे शोषण करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करणे, पोलिसांच्या दादागिरीवर नियंत्रण व नवीन रोजगार संधी उपलब्ध करून देणे, या मागण्या सरकारने मान्य कराव्या यासाठी परिषदेने फेब्रुवारी १९७२ मध्ये रस्ता रोको केले.

> या दबावामुळे रोजगार हमीचा मुद्दा राज्य काँग्रेस नेतृत्त्वाने आपल्या १५ सूत्री कार्यक्रमात समाविष्ट केला. एप्रिल १९७२ मध्ये राज्य सरकारने 'रोजगार हमी योजना' दुष्काळ निवारण कार्यक्रम म्हणून राज्यभर लागू करण्याचे ठरवले. तसेच, [रोहयोच्या अमलबजावणीच्या] तारखेपासून प्रत्येक ग्राम पंचायतीमार्फत स्थानिक रोजगार योजना कार्यान्वित करण्याचेही राज्य सरकारने ठरवले (*इकॉनॉमिक टाइम्स*, मे २, १९७२).

रोहयो कार्यान्वित केल्यानंतर परिषदेने या योजनेतील तत्कालीन तरतुदींच्या योग्य अमलबजावणीवर लक्ष केंद्रित केले. रोहयो वेतनाचे दुप्टीकरण, आठ तासांचा कामाचा दिवस, आठवड्याची सुट्टी, रोहयोच्या कामांचे ठिकाण [वस्तीपासून] पाच किलोमीटर अंतराच्या आत असणे व पन्नास वा त्यापेक्षा अधिक लोकांनी कामाची मागणी करताच रोहयोचे काम सुरू करणे, अशा परिषदेच्या मागण्या राहिल्या. संघटित कामगार वर्गाचे हक्क ग्रामीण गरिबांना मिळावेत, हा परिषदेचा यामागील हेतू होता. रोहयोच्या अमलबाजवणीकरता परिषदेने अनेक संघर्ष दिले. उदा.

> श्रीरामपूर येथे अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे कामे सुरू होत नव्हती. परिणामी, जुलै १९७२ मध्ये कामगारांनी दोन कनिष्ठ अभियंत्यांना धमकावून पकडले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपावरून त्यांना सोडण्यात आले. परंतु, त्यांनी नंतर तहसीलदाराला जबाबदार धरून त्यास ओलीस ठेवले. तातडतोब काम सुरू झाले तरच त्याला सोडण्याचे आश्वासन त्यांनी दिले. संबंधित अधिकाऱ्याने पाच नवीन ठिकाणी रोहयो काम सुरू करण्याचे वचन दिले. (*ग्रामीण श्रमिक*, मे १९७३).

तथापि, गरीबी व अवर्षणाचे परिणाम जरी निवळले तरी बेरोजगारी/अल्परोजगारीची समस्या काही कमी होत नव्हती. म्हणून, 'मागणी करताच रोजगाराचा हक्क' या घोषणेद्वारे दुष्काळ निवारण कार्यक्रम एक कायमस्वरूपी हक्क बनविण्यासाठी परिषद प्रयत्नशील राहिली (मुलाखत, डी. एस. देशपांडे, ऑगस्ट १३, २००३). या योजनेसाठी राज्य सरकारने कायमस्वरूपी निधी उभा करावा, अशी मागणी परिषदेने केली. मार्च १९७३ मध्ये तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी पाच कोटी रुपयांची ग्वाही दिली. परंतु गरिबांच्या कल्याणाकरिता ही रक्कम पुरेशी नव्हती. १९७३च्या अखेरीस सुमारे

१,५४,००० रोहयो केंद्रांवर २५ लाख कामगार काम करत होते. याच सुमारास परिषदेने रोहयोसाठी शहरी व्यवसायिकांकडून कर आकारला जावा असा प्रस्ताव मांडला.

परिणामी, डिसेंबर १९७४ मध्ये भारताच्या संविधानातील कलम ४१ मधील शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अन्वये काम मागणाऱ्याला पूर्ण रोजगार देण्याची जबाबदारी सरकारने आपल्या वित्तीय व आर्थिक धोरणाचा मूलभूत उद्देश म्हणून एका परिपत्रकाद्वारे स्वीकारला (GR 1974). या परिपत्रकात परिषदेच्या सर्व मागण्या समाविष्ट करून या योजनेच्या निधीसाठी नवा व्यावसायिक कर लागू करण्याचे जाहीर केले. तरीही, सरकारने रोहयोचे वेतन कृषी क्षेत्रातील वेतनापेक्षा कमी ठेवले. रोहयोतील वेतन कृषी वेतनाच्या पातळीवर आणण्यासाठी, रोहयो कायद्याच्या तरतुदींची योग्य अमलबजावणी होण्यासाठी व कामगारांना प्रशिक्षित करण्यासाठी परिषदेने कामगारांना संघटित करण्यास सुरुवात केली.

आणीबाणीच्या काळात परिषदेचे काम मंदावले. १९७८ साली रोहयो कायदा बनल्यानंतर रोहयोच्या योग्य अमलबजावणीच्या दिशेने परिषदेचे कार्य सुरू झाले. परिषदेच्या मागण्यांमध्ये स्त्री-पुरुषांना समान वेतन, सामाजिक सुरक्षितता, पेन्शन, भत्ता, पाळणाघर, पिण्याचे पाणी, निवारा, बाळंतपणाची सुट्टी आणि ओळखपत्र आदिंचा समावेश होता. कंत्राटदारी पद्धती नामशेष करणे, हजेरीपुस्तक भरणाऱ्या कारकुनांना कायमस्वरूपी नोकरी देणे व रोहयोची कामं जंगल खात्यातही लागू करणे, ह्याही परिषदेच्या मागण्या होत्या.

रोहयो कायद्यातील तरतुदींची योग्य अमलबजावणी व लहान शेतकऱ्यांची दुरावस्था व प्रतिकूल आर्थिक परिस्थितीविषयी काम करणं परिषदेने सुरू ठेवले. कृषी कर्ज माफ करावे यासाठी परिषदेने १९७९ मध्ये सोलापूर व उस्मानाबाद येथे सभा भरवल्या. रोहयोची कामं सुरू करण्यातील दिरंगाई, रोहयोतील भ्रष्टाचार, वेळेवर वेतन व योजनेअंतर्गत दिलेल्या फूड कुपन्सना रेशनिंग दुकानांची मान्यता देणे, असे मुद्देही परिषदेने लावून धरले. परिषदेची सभासद संख्या १९७०च्या दशकात दहा हजारावरून साठ हजारापर्यंत पोचली (मुलाखत, डी. एस. देशपांडे, ऑगस्ट २८, २००३).

तरीही परिषदेचे काम काही जिल्ह्यांपुरतेच मर्यादित राहिले; इतर जिल्ह्यांत संयुक्त समाजवादी पक्षाची शेतकरी शेतमजूर पंचायत व इतर NPPFsचे प्राबल्य होते. परंतु कालौघात, ग्रामीण गरिबांची परिस्थिती सुधारल्यामुळे परिषदेने असंघटितांना संघटित करण्याकडे आपले लक्ष वळवले. १९८४ मध्ये प्रथमच परिषदेने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून अहमदनगर जिल्ह्यात रोहयोची कामे सुरू न केल्यास सरकारने (कामगारांना) बेकारी भत्ता द्यावा असे सूचवले. न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निर्णय दिला. तरीही १९९९ पर्यंत सरकारने या आदेशाचे पालन केले नाही. यावरून सरकारच्या प्राधान्यक्रमात रोहयोला स्थान उरले नव्हते असेच दिसून येते. तथापि, रोहयो काम कायमस्वरूपी नसतानादेखील ग्रामीण गरिबांना संघटित करून त्यांना संघटित शहरी कामगारांच्या तोडीचे हक्क मिळवून देण्यात परिषदेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली.

सत्तरीच्या दशकात यशस्वी ठरलेल्या या परिषदेचे अचानक १९८०च्या दशकाच्या अखेरीस महत्त्व का ओसरले? परिषदेचे संस्थापक-सदस्य बी. आर. बावके यांच्यामते रोहयोची कामं परिषदेच्या प्रभाव क्षेत्रात घटू लागली व याचा परिषदेच्या संघटनात्मक कामावर विपरीत परिणाम झाला. तसेच, LNPच्या एका गटाने काँग्रेसला पाठिंबा द्यायचे ठरवल्यामुळे पक्षात व परिषदेत फूट पडली; यामुळे अहमदनगरमधील परिषदेची ताकद क्षीण झाली. सोबत, १९८३-८४ मधील मुंबईतील गिरणी कामगारांच्या अयशस्वी संपाचा राज्यातील सर्व डाव्या कामगार संघटनांना फटका बसला व LNPची गंगाजळी आटली. याच सुमारास जमातवादाची वाढ व शासनाचा विकासात्मक कार्यक्रम बिगर-शासकीय संस्थांना सोपवण्याकडे वाढता कल, यामुळे जनआंदोलनांची पीछेहाट होऊ लागली. आज श्रीरामपूर कार्यालयातील काही फाईलींपुरते परिषदेचे अस्तित्व शिल्लक राहिले आहे.

## युवक क्रांती दल

पुण्यातील एक विद्यार्थी संघटना म्हणून १९६९ मध्ये युक्रांदची सुरुवात झाली. प्रारंभी, महाराष्ट्रातील महाविद्यालयं व विद्यापीठं यांतील विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यात ती कार्यरत होती. पुणे, मुंबई व औरंगाबादमध्ये संघटन करत असताना, विद्यार्थ्यांना व खासकरून दलितांसारख्या वंचित समूहांना, भेडसावणाऱ्या समस्यांची त्यांना ओळख पटली. एव्हाना, पिळवणुकीविरुद्ध 'दलित' म्हणून या जाती जागृत होत होत्या व युक्रांदच्या नेत्यांनी उभरते दलित साहित्य व नंतर दलित पँथर चळवळीच्या रूपात अभिव्यक्त झालेल्या दलित पिळवणुकीकडे सांस्कृतिक व विचारसरणात्मक अंगाने पाहिले [ऑमव्हेट १९९२].

युक्रांदच्या उच्चवर्णीय नेत्यांनी त्यांच्या वैयक्तिक पार्श्वभूमीचा राजकारणावर होणाऱ्या परिणामांचा पुनर्विचार करण्यास सुरुवात केली. जातीव्यवस्थेबाहेर (de-caste) पडण्याची गरज त्यांनी प्रतिपादली.

> मार्क्सने समाजवाद्यांकडून de-class होण्याची अपेक्षा धरली. कम्युनिस्ट पक्षात दाखल झाल्यापासून प्रत्येक मध्यमवर्गीय बुद्धीजीवीला त्याच्या वर्गीय पक्षपातीपणाची जाणीव करून देण्यात येते. [परंतु] क्रांतीकारी कारवाया हाती घेण्याअगोदर या देशातील समाजवाद्यांनी आपण de-caste होणे जरूरीचे आहे, हे ओळखले. (नलिनी पंडित, युक्रांदच्या सदस्यांना लिहिलेले पत्र, युक्रांद फाईल्स, १९८२-८३, सरदार अभिलेखागार).

ही निष्ठा लग्नासारख्या व्यक्तिगत संबंधातही पाळली गेली, ज्यामुळे

तोवर दलित समाजात दलितेतरांना प्राप्त नसलेले स्थान युक्रांदच्या अनेक उच्च जातीय नेत्यांना मिळाले (मुलाखत, एस. पी. पुनाळेकर, मार्च ७, २००३).

मार्क्स, गांधी, फुले व आंबेडकरांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन युक्रांदने इतर डाव्या पक्षांप्रमाणेच गावातील विषम जमीन मालकीचा निषेध करत ग्रामीण भारतात समग्र जमीन वाटपासाठी आग्रह धरला. सुरुवातीस राममनोहर लोहियांच्या समाजवादी विचाराकडे आकृष्ट झालेले युक्रांदचे नेतृत्व नंतर मार्क्सवाद व दलित भूमिकेतून त्याच्या परिणामकारकतेबद्दल साशंक बनले. युक्रांदच्या टीकेचा रोख दोन स्तरांवर होता. एक, तो मुख्यप्रवाही समाजवादी पक्षांवर होता, ज्यांनी जातीय शोषणाचे स्वरूप तर समजून घेतले परंतु समाजाच्या पुनर्रचनेच्या राजकीय रणनीतीत त्याला समाविष्ट केले नाही. दोन, बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षाने सत्ता समीकरण बदलण्यासाठी निवडणुकीच्या राजकारणाचा पुरस्कार केला. युक्रांदच्या मते यामुळे खऱ्या क्रांतीच्या उद्दिष्टांकडे यांत्रिक दृष्टिकोनातून पाहण्यात आले. युक्रांदला सर्व स्तरांवरील संघटनात्मक कामांमध्ये सहभागी लोकशाही अभिप्रेत होती. त्यामुळे विषयांची सखोल चर्चा व वाद विवादांवर आधारलेल्या सामूहिक निर्णय प्रक्रियेचा युक्रांदच्या नेतृत्वाने आग्रह धरला.

दुष्काळ निवारण व निर्मूलन समितीत युक्रांदचा सहभाग होता. आरंभी युक्रांदच्या मागण्या परिषदेसारख्याच होत्या. परंतु, १९७२ मध्ये राज्य सरकारने रोहयो कार्यक्रम लागू केल्यावर युक्रांदच्या कामाचे स्वरूप प्रकर्षाने बदलले. परिषदेप्रमाणेच युक्रांदच्या नेत्यांनाही रोहयो कायमस्वरूपी रोजगार कार्यक्रम व्हावा असे वाटत असतानाच, जाती अधिष्ठित वर्गीय शोषणासंबंधी त्यांचे विकसनशील विचार व जातीविरहित समाज उभारण्याबद्दलच्या त्यांच्या कल्पना त्यांनी आपल्या कृतीत समाविष्ट केल्या. गेल ओमव्हेट सूचवतात त्याप्रमाणे

> 'जातीव्यवस्था' व 'वर्गीय रचना' हे दोघं एकमेकांत गुंफलेले असल्यामुळे, दोघांना वेगळे काढून संबोधणे अशक्यप्राय होते. यातून एक निष्कर्ष असा निघतो की निम्न जाती व खासकरून पूर्वास्पृश्य (दलित) हे शेतमजूर व कामगार या सर्वहारा श्रमिकांच्या विभागणीतही बहुसंख्येने आहेत.... 'जात आणि वर्ग' हे समांतर मानणे व कामगार वर्गाने 'आर्थिक क्रांती'चे पुढारीपण करणे तर दलितांनी 'जातविरोधी' क्रांतीचे नेतृत्व करणे, असे समांतर लढे उभारणे हे अशास्त्रीय व दिशाभूल करणारे आहे [ओमव्हेट १९८२].

युक्रांदच्या नेत्यांनी आपले विचार कृतीत उतरवल्याचे पुरावे म्हणून त्यांनी दोन ठिकाणी आरंभलेल्या सामाजिक पुनर्रचनेच्या प्रयोगांचे उदाहरणं देता येतील—१९७३ मधील अहमदनगर जिल्ह्यातील राशीन गावी कुमार सप्तर्षींनी सुरू केलेला पहिला प्रयोग व १९७९ मध्ये शांताराम पंदेरे यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात आरंभलेला असाच दुसरा प्रयोग. युक्रांदच्या मते राशीन ही 'प्रयोगशाळा' होती तर वैजापूर हे 'कार्यक्षेत्र' होते.

राशीन सतत अवर्षणग्रस्त व सर्वात मागासलेल्या गावांपैकी एक गाव होते. परंतु येथील अधिकतर जमीन मुबलक पाणी लागणाऱ्या ऊस लागवडीखाली होती. परिणामी, जमीनदारांनी आपल्या जमिनी बागायती केल्या व दलित व निम्न मराठा जातीतील बहुतेक लहान व सीमांत शेतकऱ्यांना व भूमिहीनांना त्यापासून वंचित ठेवले. १९७०च्या दशकाच्या सुरुवातीला झालेल्या दुष्काळाचा या प्रदेशाला जबर फटका बसला. कोणतीच जमीन सुधारणा न झालेल्या या प्रदेशात गावातील जजमानी व्यवस्थेने दलितांचे मराठा जमीनदारांवरचे अवलंबन वाढवले होते व त्यांना आपली भौतिक व सांस्कृतिक पिळवणूक स्वीकारण्यास भाग पाडले होते.

१९७३ मध्ये दलितांमध्ये 'एक होऊन' सप्तर्षींनी दलितांना संघटित केले. सप्तर्षींनुसार, "आम्ही दलितांच्या घरी राहिलो व रोहयोची कामं ही संघटन करण्याची केंद्रं होती"(मुलाखत, फेब्रुवारी १२, २००३). कसणाऱ्याला जमीन देणे, जमीनधारणा कायद्याखाली हस्तगत केलेली सामायिक संसाधनं व चराऊ जमीनीचे भूमिहीन व दलितांमध्ये वाटप करणे, किमान वेतन पुरवणे, कर्ज माफ करणे, दुष्काळ निवारण कार्यक्रमांची व्याप्ती वाढवणे व जमीनदारी (खासकरून मराठवाड्यामध्ये) नष्ट करून दलितांना सर्व प्रकारच्या दास्यातून मुक्त करणे, ह्या युक्रांदच्या शासनाकडून काही अपेक्षा होत्या.

राशीनच्या यशानंतर युक्रांदच्या नेत्यांना उमगले की दलितांना संघटित करण्याव्यतिरिक्त मराठा आश्रयदात्यांच्या बालेकिल्ल्यांना खिंडार पाडण्याची क्षमता रोहयोमध्ये आहे. पर्यायी रोजगार उपलब्ध करून, रोहयोने आश्रयदाता-आश्रित परावलंबनापासून दलितांना मुक्त केले. अर्थात, ह्या परावलंबनाला सामाजिक आधार असल्यामुळे दलितांची इतर सामाजिक शोषणापासून मुक्ती साधण्यासाठी दीर्घकालीन तोडगा आवश्यक होता.

परिषदेप्रमाणे युक्रांदलाही ग्रामीण गरिबांनी मागणी करताच उपलब्ध होणारा कायमस्वरूपी रोजगार कार्यक्रम म्हणून रोहयो आवश्यक वाटत होती. लोकोपयोगी कामांच्या संकल्पनेची व्याप्ती वाढवून तिची लोकशाही व 'संपूर्ण क्रांती'च्या संकल्पनाशी सांगड घालण्याचा त्यांनी यत्न केला. दलितांचे भौतिक व सांस्कृतिक शोषण मिटवण्यासाठी व त्यांच्याकडे भांडवल निर्माण करण्यासाठी, रोहयोअंतर्गत कोणत्या प्रकारची सार्वजनिक मत्ता निर्माण करावी याचा निर्णय दलितांना करू द्यावा, असे युक्रांदचे मत होते. पाणलोट विकासाद्वारे बंजर जमिनीचा विकास साधून या जमिनींचे नंतर दलितांमध्ये वाटप करावे, असे युक्रांदने सुचवले.

आणीबाणीनंतर १९७७मध्ये सप्तर्षी जनता पक्षात शिरल्यानंतर युक्रांदमध्ये मुख्यप्रवाही पक्षीय राजकारणाच्या मुद्यावरून फूट पडली

व १९७८मध्ये रोहयोंचा कायदा लागू झाल्यानंतर विघटित युक्रांदमार्फत कायद्याच्या अमलबजावणीचे स्थानिक पातळीवर प्रयत्न चालू राहिले. शांताराम पंदेरे व मंगल खिंवसरा यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर येथे, अजित सरदार यांनी पुणे जिल्ह्यातील खेड येथे तर रंगा राचुरे यांनी लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे अशा कामास प्रारंभ केला. १९७९मध्ये औरंगाबादच्या औद्योगिक शहरापासून ७० किलोमीटरवर सर्वांत मागासलेला म्हणून मानला गेलेल्या ७२ गावांच्या वैजापूर तालुक्यात पंदेरे यांनी नांदूर माधेश्वरच्या सिंचन कालव्याचे काम रोहयोंखाली राबवावे यासाठी दलितांना संघटित केले. हा कालवा एका मराठा जमीनदाराच्या शेतजमिनीतून जात असल्यामुळे त्याने उच्च न्यायालयात याविरुद्ध खटला भरला, ज्याचा निकाल २० वर्षांनंतर गावकऱ्यांच्या बाजूने लागला. अन्य जमीनदारांना हा कालवा खाजगी कंत्राटदारांमार्फत (जे त्यांच्या नात्यागोत्यातलेच होते) बांधला जाण्यास मान्यता दर्शविली. परंतु ग्रामीण गरिबांनी हे काम रोहयोंमार्फतच पार पाडले जावे असा निर्धार दाखवला व शेवटी सरकारने त्यांच्या मागणीस दुजोरा दिला.

१९८०च्या दशकाच्या सुरुवातीला युक्रांदने गावागावात लोकसमित्या स्थापन करून रोहयोंच्या कामांचे स्वरूप ठरवणे, कामांचे ठिकाण निवडणे व वेळेवर किमान वेतन देण्याचे पालन करणे, या विषयीचे निर्णय अधिकार या समित्यांना दिले. चराऊ व जंगल जमीन सरकारने भूमिहीनांच्या नावे नोंदवावी यासाठी दबाव आणणे, गावठाण व चराऊ जमिनींवर हक्क सांगणे व जमीन बळकाव चळवळी उभारणे, यासारख्या मोहिमा लोकसमित्यांनी हाती घेतल्या. परंतु १९८२ मध्ये राज्यात मार्क्सवादी-लेनिनवादी चळवळीशी संलग्न होण्याच्या मुद्यावरून या संघटनेत अजून एक फूट पडली, ज्यामुळे हळूहळू क्षीण होत ही संघटना १९९४ मध्ये बरखास्त करण्यात आली.

## श्रमिक संघटना

१९६७ मध्ये पुण्यात मागोवा[१] या मार्क्सवादी विद्यार्थी गटाची स्थापना झाली. सुलभा ब्रम्हेंच्या मते

> जरी प्रारंभीच्या स्वातंत्र्योत्तर काळात कम्युनिष्ट पक्ष जहाल असले तरी सत्तरीच्या दशकापर्यंत त्यांनी संसदीय राजकारणाशी जुळवून घेतले होते. संसदीय राजकारणाच्या मर्यादांमुळे अनेक तरुण पर्यायांच्या शोधात जहाल बनले (मुलाखत, जून १६, २००३).

वरील विश्लेषणाशी सहमती दर्शवत मागोवाचे एक संस्थापक सदस्य सुधीर बेडेकर सांगतात की शेतकरी व भूमिहीनांचे समकालीन प्रश्न, भारतीय भांडवलशाहीच्या स्वरूपाचे आकलन व ग्राम राजकीय पर्यायांचे टीकास्त्र याबाबत गटात चर्चा घडवून आणली जायची. एकीकडे, किसान सभा व नक्षलवादी चळवळींसारख्या अखिल भारतीय चळवळींच्या अपयशाबद्दल चिंता तर दुसरीकडे, राजकीय पक्षांमध्ये जाणे म्हणजे काही प्रमाणात तडजोड व स्थितीशीलता स्वीकारणे, याबद्दल गटांतर्गत जाणीव होती. नक्षलवादी चळवळीपासून प्रेरणा घेणाऱ्या मागोवा गटाने नक्षलवाद्यांच्या 'उच्चाटना'ची रणनीती अस्वीकार केली. त्यांच्यामते आदिवासींचे शोषण करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध जनआंदोलन उभारणे महत्त्वाचे होते व जमीनदार, काँग्रेस पक्ष व शासकीय यंत्रणा यांस ते प्रमुख शत्रू मानत. महाराष्ट्रातील आदिवासींचा मागोवा घेताना त्यांचे शोषण वसाहतवादी काळात तीव्रतर झाल्याचे आढळते. खासकरून शेतीवरील कर व शेतजमीनीच्या व्यापारीकरणामुळे आदिवासी जमिनींचे झालेले हस्तांतर. यामुळे आदिवासी लहान जमीनधारक न राहता भूमिहीन शेतमजूर व बटाईने कसणारे शेतकरी होऊन राहिले. ही प्रक्रिया स्वातंत्र्योत्तर काळातही चालूच राहिली [ब्रह्मे व उपाध्याय १९७९, गारे १९७४].

गोदावरी परुळेकरांच्या नेतृत्वाखालील किसान सभेचे लढे व काही गांधीवादी गट, प्रजा समाजवादी पक्ष व भूमिसेनेसारख्या संघटनेच्या कामाच्या पार्श्वभूमीवर मागोवाने ठाणे व धुळे जिल्ह्यांत काम सुरू केले. पूर्वी सर्वोदय मंडळाशी निगडित असलेल्या अंबरसिंह सुरतवंती या स्थानिक आदिवासी नेत्याने धुळ्यामध्ये आदिवासींना संघटित केले. सर्वोदय तत्त्वज्ञानाबद्दल भ्रमनिरास होऊन त्यांनी ग्रामस्वराज्य समिती स्थापन करून भू-मुक्ती आंदोलन छेडले. जानेवारी १९७२मध्ये अंबरसिंहच्या चळवळीत मागोवा कार्यकर्ते सामील झाले. आदिवासींवर झालेल्या हिंसक घटनेच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या एका संमेलनापासून ही चळवळ सुरू झाली. धुळे जिल्ह्यातील गुजर व मराठा जातीतील जमीनदारांनी केलेल्या अत्याचाराविरुद्धच्या एका दीर्घकालीन लढ्यास ते सज्ज झाले. कार्यकर्त्यांनी राजकीय पक्षांपासून अलिप्त राहणे, चळवळीच्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारणे, व स्वरक्षण सोडून अन्यथा हिंसेचा अवलंब न करण्याचे संमेलनात ठरले. जून १९७२ मध्ये मागोवा कार्यकर्त्यांनी श्रमिक संघटना स्थापना केली, जी ग्रामस्वराज्य समितीशी ताळमेळ राखे. रोहयोंमार्फत सुरू झालेल्या दुष्काळ निवारण कार्यांच्या संदर्भातच ही सर्व संघटन प्रक्रिया घडत होती.

दुष्काळ तीव्र असताना श्रमिक संघटनेची स्थापना झाली असल्यामुळे, आदिवासींना रोजगार मिळवून देण्यावर त्यांचा प्रमुख रोख होता. कार्यकर्ते रोहयो कामांच्या स्थळांवर राहत व शोषण व जमीनदारांचा प्रतिकार करण्यासाठी आदिवासींमध्ये जाणीव जागृती करत. कृषी हंगामात जमीनदारांकडे आदिवासी आपले श्रम स्वस्तात विकत. संघटनेच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी जमीनदारांवर बहिष्कार टाकला. घेराव, रस्ता रोको, सरकारी कार्यालयांसमोरील धरणे, आदिवासींचे लांब पल्ल्याचे मोर्चे, यामार्फत संघटनेने दबाव लावून धरला. संघटनेने आदिवासींच्या छळवणुकीसाठी सरकारी अधिकारी व पोलिस यांना धारेवर धरले. सार्वजनिकरित्या शोषणकर्त्या दुकानदारांना शिक्षा केली जाई. या तंत्रांमुळे

आदिवासींचे सबलीकरण झाले.

आदिवासींची बेकायदेशीररित्या जमीनदारांनी व / किंवा सावकारांनी कसलेली जमीन परत करणं, हे संघटनेच्या क्रांतीकारी धोरणात समाविष्ट होते. जमीनदारांनी बेकायदेशीररित्या हडप केलेल्या आदिवासी जमीनींचं संघटनेनं सर्वेक्षण केलं. परिणामी, वाटाघाटी व संघटित लढ्यांद्वारे मे १९७२ पर्यंत त्यांनी १८७२ एकर जमीन आदिवासींना परत मिळवून दिली. आदिवासींनी विशिष्ट कालावधीसाठी कसायला दिलेली जमीन त्या अवधीच्या समाप्तीनंतर तावडतोब आदिवासींकडे हस्तांतरित होणं, जंगलातील नांगरणी कायदेशीर घोषित करणं व रोजगारासाठी सरकारने कार्यक्रम हाती घेणं, या संघटनेच्या काही मागण्या होत्या.

महाराष्ट्रातील इतर भागांप्रमाणेच धुळे जिल्ह्यातील जमीनदार मराठा होते. किसान सभेची 'जमीन बळकाव' चळवळीचे संघटनेने अनुकरण केले. १९७२-७४ दरम्यान ४ हजार एकर जमीन हस्तगत करण्यात आली. जंगल जमीन कसणाऱ्या आदिवासींची नोंदणी करणं, त्यांच्याकडून उपटलेले हप्ते परत करणे, त्यांची कर्जे माफ करणं, त्यांच्यात जमिनीचं पुनर्वाटप करणं, त्यांच्याविरुद्धचे सर्व न्यायालयीन व पोलिस खटले मागे घेणं व मागणी होताच रोहयोची कामं सुरू करणं, त्या संघटनेच्या १९७३ मधील काही मागण्या होत्या. संघटनेच्या उत्कर्षकाळी तिचे १५-२० हजार सभासद होते. निधी सभासदांकडून गोळा केला जाई; सोबत, मोठ्या शहरांतील हितकर्तेही आर्थिक मदत पुरवत. युक्रांदप्रमाणेच संघटनेमधील निर्णय प्रक्रिया लोकशाही पद्धतीने होई. परिणामी, १९७९ मध्ये संघटनेच्या १४ पूर्णवेळ कार्यकर्त्यांपैकी ८ कार्यकर्ते आदिवासी होते.

संघटनेने लोकसमिती, तरुण मंडळ, महिला मंडळ स्थापन केल्या. संघटनेचे एक संस्थापक सदस्य दीनानाथ मनोहरांनुसार रोहयो कामांवर देखरेख ठेवणे, काम, वेतन, अन्न धान्याच्या दर्जाचा व हिश्शाचा हिशोब ठेवणे, पिण्याचे पाणी व निवासाची व्यवस्था करणे व अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारावर पाळत ठेवणे, ही कामं तरुण मंडळाचे कार्यकर्ते करत. त्यांच्या लढाऊपणासाठी स्थानिक प्रशासनही त्यांचा आदर करीत असे (मुलाखत, सप्टेंबर २९, २००२).

आणीबाणीत संघटनेची कामं मंदावली व आणीबाणीनंतर रोहयोच्या अंमलबजावणीसाठी झालेले संघटन तुरळक होते. परंतु, कार्यकर्त्यांमधील वैचारिक व व्यक्तिगत मतभेदांमुळे संघटना टिकू शकली नाही. जरी संघटनेने मुख्यप्रवाही पक्षांपासून दूर राहण्याचे धोरण स्वीकारले होते तरी काहींनी कम्युनिस्ट पक्ष, लाल निशाण पक्ष व बिगर-शासकीय संघटनांमध्ये जाण्याचे ठरवल्यामुळे संघटनेच्या पडझडीस सुरुवात झाली. १९८२ पर्यंत अधिककरून सर्व नेत्यांनी संघटना सोडली होती व धुळे जिल्ह्यातील संघटनेची इमारत एवढेच तिचे अस्तित्व उरले.

### कष्टकरी संघटना

मुंबईतील कॅथॉलिक चर्चच्या सदस्यांनी १९७९मध्ये कष्टकरी संघटना स्थापन केली. संघटनेचे संस्थापक प्रदीप प्रभू, निकी कार्डोझो व सुशिला डिसुझा यांनी ठाण्यातील तलासरी तालुक्यातील ख्रिश्चन मिशनमध्ये याअगोदर काम केले होते. लिबरेशन थियॉलॉजीने प्रभावीत झालेल्या या नेतृत्वाने आदिवासींवर होणारी हिंसा व त्यांच्या शोषणाबद्दल निष्क्रिय राहण्याबाबत चर्चवर टीका केली, ज्यामुळे त्यांनी मिशन सोडून ठाणे जिल्ह्यातील डहाणु तालुक्यात वरील संघटना स्थापन केली.

उपरोक्त संघटनांपेक्षा कष्टकरी संघटना अनेक बाबतीत वेगळी होती. ती परिषदेप्रमाणे चळवळ नव्हती; पगारी कार्यकर्त्यांद्वारे चालवलेली ती एक NGO होती. तिला क्रांतीचे स्वप्न नव्हते. आदिवासी व्यतिरिक्त बांधकाम, मिठागर व वीट भट्ट्यांवरील असंघटित कामगारांमध्ये तिचे काम राहिले. मध्यम वर्गाचा पाठिंबा मिळवण्यासाठी त्यांनी प्रसार माध्यमांचा उपयोग केला. संघटनेच्या सुरुवातीच्या काळात रोहयोसंबंधी संघटन करणे महत्त्वाचे काम होते.

जव्हार व शहापूर तालुक्यात अनुक्रमे ९५.५३ व ९६.५९ टक्के आदिवासी दारिद्र्यरेषेच्या खाली आहेत असे संघटनेस आढळले. त्यामुळे, जमीन किंवा रोजगार याची तावडतोब गरज होती. जमीनदारांच्या अत्याचारांविरुद्ध कष्टकरी संघटनेने डहाणुमध्ये अनेक निदर्शने भरवली. प्रतिशह म्हणून जमीनदारांनी आदिवासींवर बहिष्कार टाकून बाहेरून मजूर मिळवण्यास सुरुवात केली. अशा परिस्थितीत पर्यायी रोजगार म्हणून रोहयो उपयुक्त ठरे. जेंव्हा १९८२मध्ये ठाणे जिल्ह्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली त्या वेळेस संघटनेने रोहयोची मागणी केली व सरकारने सहा हजार आदिवासींसाठी १३ रोहयो केंद्रांना मंजुरी दिली. १९८२ मध्ये धरणग्रस्तांसाठी रोहयो राबवण्यासाठी संघटनेने मागणी केल्यानंतर डहाणु व जव्हार तालुक्यांत अनुक्रमे ४० व २०० रोहयो कामं सुरू करण्यात आली.

तरीही, रोहयो श्रीमंत व्यापारी व जमीनदारांचे हितसंबंधांचे रक्षण करीत असे, असे संघटनेस आढळले. जमीनदारांच्या शेतीजवळ विहिरी वा रस्ते बांधल्यामुळे त्यांना पाणी, वाहतूक व बाजाराची सोय सुलभतेने मिळे. बहुतेक रोहयो कामं रस्ता बांधणीविषयी असल्यामुळे, संघटनेने सामाजिक वनीकरण, मृद्संधारण व लहान धरणे यासाठी सरकारने रोहयो राबवावी, असा आग्रह धरला. आदिवासींवरील जमीनदारांची पकड मोडीत काढण्यासाठी संघटनेने रोहयो वर्षभर राबवण्याची मागणी केली. १९८०च्या दशकाच्या सुरुवातीपासून कष्टकरी संघटना व त्या परिसरात पूर्वीपासून प्रबळ असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्यात खटके उडू लागले, ज्यामुळे संघटनेच्या कामांवर विपरीत परिणाम होऊन त्याचे रोहयोचे काम थंडावले.

## श्रमजीवी संघटना

जनता पक्षाचे सदस्य राहिलेल्या विवेक पंडित व विद्युलता पंडित यांनी ऑक्टोबर १९८२मध्ये कामगार संघटना म्हणून श्रमजीवी संघटना सुरू केली. त्याअगोदर १९७९ मध्ये त्यांनी मुंबईतील दहीसर येथील झोपडपट्ट्यांमध्ये काम करणारी विधायक संसद नावाची NGO स्थापन केली. येथे काम करत असताना त्यांना आदिवासींमधील वेठबिगारीबद्दल कळले व त्याविषयी एक जनहित याचिका दाखल करून त्यांनी १९९२ मध्ये काही वेठबिगारांना सोडवले.

श्रमिक संघटना व सुरुवातीच्या काळात कष्टकरी संघटना या विचारसरणात्मक बांधिलकी असलेल्या व सत्तासंबंधविषयक प्रश्न उपस्थित करणाऱ्या संघटना होत. परंतु श्रमजीवी संघटना व नंतरची कष्टकरी संघटना यांनी आदिवासी पट्टे सोडून शहरी परिघावर मिठाघर, वीट भट्ट्या व खाणींमध्ये वेठबिगार म्हणून कामाला आलेल्या आदिवासींवर लक्ष केंद्रित केले. त्यामुळे त्यांचे उद्दिष्ट असंघटित क्षेत्रात काम करण्यासाठी वेठबिगारांना मुक्त करणे हे होते. प्रसार माध्यमांद्वारा जनमत संघटित करण्यावर व समाज सेवक व कामगारांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण देण्यावर त्यांचा भर राहिला. प्रारंभीचे NPPFs रोहयोद्वारा क्रांतीसाठी राजकीय जागृती व आदिवासींच्या शोषणासंबंधी विचारमंथन घडवून आणत व त्यांची उद्दिष्ट गाठण्यासाठी हिंसेचाही अवलंबन करत. पण श्रमजीवी संघटनेने कामगारांमध्ये कायद्याने दिलेल्या हक्कांबद्दल जागृती आणण्यासाठी जनमत संघटन व अहिंसक मार्गाचा पाठपुरावा केला. प्रस्थापित आश्रयदाता-आश्रित वेठबिगार संबंध कंत्राटदारी संबंधांमध्ये परिवर्तित करण्यासाठी श्रमजीवी संघटनेने रोहयोचा वापर केला.

## समन्वय समिती

सरकारी धोरणांविरुद्ध एकत्रित येण्यासाठी व ग्रामीण महाराष्ट्रातील कामगार संघटनांच्या कामांमध्ये सुसूत्रीकरण साधण्यासाठी १९८१ मध्ये परिषद व शेतकरी शेतमजूर पंचायतीने संयुक्तरित्या समन्वय समिती स्थापन केली. परंतु १९९०च्या दशकाच्या सुरुवातीपर्यंत समितीच्या कामाला विविध कारणांमुळे ओहोटी लागली. ग्रामीण गरिबांच्या चळवळींमधील शिथिलता, एकूणच समितीच्या कार्यपद्धतीचे ढोबळ स्वरूप, समितीला संलग्न असलेल्या ग्रामीण कामगार संघटना व NGO मधील तणाव, जनता दलाशी संबंधित हिंद मजदूर संघ या कामगार संघटनेच्या कार्यालयात समितीचे ऑफीस असणे व समितीच्या निश्चित उद्दिष्टांबद्दलची मोघमता, अशा व इतर बाबींमुळे समितीच्या सदस्य संस्थांमध्ये असहमती निर्माण झाल्यामुळे, समिती अखेरीस दिशाहीन झाली.

तरीही, रोहयो संदर्भात राज्यभर मोहिमा घेणे व विधानसभेमध्ये त्याविषयी प्रश्न उपस्थित करण्याचे काम समितीने केले. तत्कालीन कृषी वेतनाएवढे रोहयोतील वेतन असावे यासाठी ७५ हजार रोहयो कामगारांचा एक दिवसाचा राज्यव्यापी संप समितीने १९८२ मध्ये संघटित केला. ऑक्टोबर २२, १९८२ रोजी एक लाख कामगारांचे आंदोलन आयोजित करून समितीने वेतनवाढ प्राप्त करून घेतली. नोव्हेंबर १९८३मध्ये १३८ सार्वजनिक सभा, प्रतिनिधींच्या १०९ बैठका, २४ शिष्टमंडळे व ७ सार्वजनिक निदर्शने भरवून समितीने रोहयो कायद्यात प्रसूति लाभ समाविष्ट करून घेण्यात यश मिळविले.

सुरुवातीच्या वर्षात समिती कामगार संघटनेच्या तत्त्वावर चालवली जायची. रोहयोवरील कामाचा व वेतनाचा चोख हिशोब, बोनस व पाळणाघर व पिण्याचे पाणी यासारख्या सुविधांसाठी समिती कार्यरत असे. पाझर तलाव, विहीर व रस्ते बांधणी या सारख्या रोहयो कामांना बांधकाम क्षेत्राचा दर्जा देऊन रोहयो कामाला त्या समान वेतन दिले जावे, यासाठी समितीने आग्रह धरला. १९८४मध्ये स्थानांतर करणाऱ्या मजुरांना प्रवास भत्ता (अर्धा हिस्सा अन्नधान्याच्या स्वरूपात) देण्याची मागणी केली.

हजेरीपुस्तक कारकुनांची संघटना बांधून व रोहयोवरील कामगारांचे व शेतमजुरांचे संयुक्त संमेलन भरवून समितीने रोहयोच्या कामातील दिरंगाई कमी करण्यात व वाढीव वेतनाच्या थकबाकीची भरपाई करून घेण्यात १९८७ मध्ये यश मिळवले. परंतु १९८८ नंतर समितीच्या कार्याला खीळ बसली. शेतकरी शेतमजूर पंचायतीचे प्रकाश शिंदे कबूल करतात,

> १९८८मध्ये [रोहयोवरील] वेतन कृषी वेतनाएवढे करण्यात आले. परिणामी, आमच्याकडे लढण्यासाठी कोणताच मुद्दा उरला नाही. तसेच, रोहयो कामांमध्ये खाजगी कंत्राटदार आणण्यासाठी केलेला कायद्यातील बदल रोखण्यात संघटना अपयशी ठरल्या. ह्या पराभवाचा फटका आम्हां सर्वांना बसला (मुलाखत, ऑगस्ट १०, २००२).

सार्वजनिक मत्ता व दीर्घकालीन रोजगारासाठी शाश्वत वाढ निर्माण करण्याच्या कार्यक्रमांबद्दल समितीमध्ये क्वचितच चर्चा घडे. दुसरीकडे, सरकारने रोहयोपेक्षा अधिक वेतन देणाऱ्या जवाहर रोजगार योजना व रोजगार आश्वासन योजना सारखे नवे कार्यक्रम राबवायला सुरुवात केली. समितीने स्थानिक प्रश्नांकडेही दुर्लक्ष केले, ज्यामुळे सभासद संघटनांचा त्यातील सहभाग खालावला (मुलाखत, भारत पाटणकर, मार्च १५, २००३; अजित सरदार, जुलै १९, २००३; नागेश हटकर, डिसेंबर २८, २००२).

निष्कर्ष :

ग्रामीण गरिबांच्या रोजगाराच्या हमीसाठी काम करणाऱ्या अनेक NPPFs १९७०च्या दशकात महाराष्ट्रात अस्तित्वात आल्या. १९७०च्या दशकाच्या सुरुवातीला राज्यात पडलेला दुष्काळ हे यामागील तत्काळ कारण ठरले. या संघटन प्रक्रियेच्या कालावधीत

दलित, आदिवासी, भूमिहीन व लहान शेतकऱ्यांच्या शोषणाचे स्वरूप त्यांनी ऐरणीवर आणले. समाजवादी व साम्यवादी विचारांशी बांधिलकी असलेल्यांनी NPPFsचे नेतृत्व केले. आपल्या संघर्षातून दुष्काळ निवारण कार्यक्रम एक कायमस्वरूपी रोजगार कार्यक्रम करण्यात व त्यातील कामगारांना शहरी औद्योगिक कामगारांचे हक्क मिळवून देण्यात NPPFs यशस्वी ठरल्या. जमीन सुधारणा/जमीन धारणा कायद्यांद्वारे व बंजर जमिनींच्या वाटपातून महाराष्ट्रातील शेतीचे पुनर्घडण करण्यासाठी व रोहयोद्वारा शाश्वत सार्वजनिक मत्ता उभारण्यासाठी या NPPFs प्रयत्नशील राहिल्या. लोकशाहीचे तत्त्व अंमलात आणत, स्थानिक सहभाग व श्रेणीविरहीत कार्यपद्धती राबवण्यासाठी त्यांनी योग्य ते संघटनात्मक फेरबदल घडवून आणले.

आणीबाणीने एकीकडे रोहयोसंबंधी जनसंघटनात्मक कामांवर बंधने घातली तर दुसरीकडे, आणीबाणी उठल्यानंतर, अनेक कार्यकर्ते काँग्रेसच्या विरोधात इतर मुख्यप्रवाही पक्षांमध्ये सामील झाले. या दोन घडामोडींमुळे, १९७८मध्ये रोहयोचा कायदा राज्यात पारित होऊनसुद्धा, श्रमिक संघटना व युक्रांद ह्या दोन संघटना फुटल्या.

१९८०च्या सुरुवातीला महाराष्ट्रात नवीन परिस्थिती आकार घेत होती. राज्यात शहरीकरणाचे प्रमाण वाढत होते. शासनाने गरीबांसाठी लक्ष-निर्धारित (target-oriented) कार्यक्रम राबवयाला सुरुवात केली, ज्यामुळे ग्रामीण गरीब दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील अशा दोन कप्प्यांमध्ये विभागले गेले. १९८७ पासून सरकारने विकासात्मक समाज-कल्याण कार्यक्रमांत NGOsना सहभागी करून घेण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे राजकीय चळवळींपेक्षा व्यावसायिक समाजकार्य करणाऱ्या संस्थांमध्ये अनेक संघटनांचे परिवर्तन झाले. कष्टकरी संघटना व श्रमजीवी संघटना ही त्याची उदाहरणं होत.

रोहयो अमलात येऊन ३५ वर्षांनंतरही दुष्काळी परिस्थिती काही हटली नाही. प्रत्येक उन्हाळ्यात राज्य सरकार काही तालुके व जिल्हे अवर्षणप्रवण म्हणून घोषित करते. लोकचळवळींनी हे घडू नये यासाठी काही उपाय सुचवले होते. युक्रांदने सुचवल्याप्रमाणे सार्वजनिक मत्ता निर्माण करण्यासाठी नापिक जमीनीचा वापर किंवा श्रमिक मुक्ती दलाने दाखवून दिल्याप्रमाणे लहान व सीमांत शेतकऱ्यांना नियमित पाणी पुरवठ्यासाठी लहान व मध्यम धरणांची बांधकामं, यासारखे प्रयोग रोहयो कायद्यात समाविष्ट करता येतील का? कोणत्या प्रकारच्या सार्वजनिक मत्ता व त्याच का, हे ठरवण्याचा हक्क स्थानिक समुदायांना मिळेल काय? असे कार्यक्रम स्थानिक लोकशाही प्रयोगांचा हिस्सा होऊ शकतील का? तरीही, नव्याने प्रस्तावित केलेल्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयकात महाराष्ट्रातील अनुभवांतून बोध घेतलेला आढळत नाही. रोहयोसंदर्भात ग्रामीण गरीबांनी दिलेल्या लढ्यांचे योगदान प्रस्तावित विधेयकामध्ये समाविष्ट करणे अगत्याचे आहे.

[आभार : युक्रांदचे अजित सरदार व लाल निशाण पक्षाचे डी. एस. देशपांडे यांनी या संशोधनासाठी आपले खाजगी अभिलेखागार उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.]

टीपा :

१) हे संशोधन २००२ ते २००४ मधील १४ महिन्यांत पार पाडण्यात आले. हे संशोधन सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांच्या प्रदीर्घ मुलाखती व त्यांच्या संघटनांवर बेतलेले आहे. अनेक अन्य राजकीय कार्यकर्ते, गावकरी व अभ्यासक यांच्याही मुलाखती घेतल्या गेल्या. अप्रकाशित स्वरूपातील प्राथमिक माहिती, वर्तमान पत्रांतील वृत्तांत, विविध संघटनांच्या फाईली, पत्रकं व इतर अंतर्गत कागदपत्रं या संशोधनासाठी अभ्यासली गेली. समन्वय समितीच्यापाशी असलेल्या ८५ संघटनांच्या यादीतून दोन कालखंडात (१९७८ पूर्व व १९७८ नंतर) रोहयोसंबंधी कामगारांना संघटित करण्यात सर्वात क्रियाशील असलेल्या पाच बिगर-पक्षीय राजकीय संघटनांची निवड करण्यात आली.

२) कुमार सप्तर्षी, अजित सरदार, शांताराम पंदेरे, सुभाष लोमटे, रंगा राचुरे, हुसेन दलवाई, मधु मोहिते, नलिनी पंडित, रत्नाकर महाजन हे युक्रांदच्या काही प्रमुख तरुण नेत्यांपैकी होत.

३) सुधीर बेडेकर, कुमार शिराळकर, अनंत फडके, दीनानाथ मनोहर, अशोक मनोहर, विक्रम कान्हेरे, भारत पाटणकर, छाया दातार हे या संघटनेचे प्रमुख सदस्य होत.

४) धुळे, ठाणे, रायगड व चंद्रपूर जिल्ह्यांत आदिवासी लोकसंख्या बहुसंख्य आहे. १९७१ मध्ये ठाणे जिल्ह्यात ६७.२८ टक्के तर धुळे जिल्ह्यात ४० टक्के लोकसंख्या आदिवासी होती. त्यांतील ९० टक्क्यांहून अधिक दारिद्र्यरेषेखाली जगत.

संदर्भ :

ओमव्हेट, गेल (१९९४) : *रि-इनव्हेंटिंग रिव्होल्यूशन -- न्यू सोशिअल मुव्हमेंटस् अँड द सोशालिस्ट ट्रेडिशन इन इंडिया*, एम. ई. शार्प, लंडन.

ओमव्हेट, गेल (संपा) (१९८२) : *लँड, कास्ट अँड पॉलिटिक्स इन इंडियन स्टेटस्*, राज्यशास्त्र विभाग, दिल्ली विद्यापीठ, दिल्ली.

कोठारी, रजनी (१९८९) : *पॉलिटिक्स अँड द पीपल — इन सर्च ऑफ अ ह्युमेन इंडिया*, दोन खंड, अजंठा, नवी दिल्ली.

गारे, गोविंद (१९८४) : 'आदिवासींच्या आर्थिक विकासाचा कार्यक्रम', *साधना*.

ब्रह्मे, सुलभा व अशोक उपाध्याय (१९७९) : *अ क्रिटिकल अॅनॅलेसिस ऑफ द सोशिअल फॉर्मेशन अँड पिजंट रेझिस्टन्स इन महाराष्ट्र*, खंड ३, शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे.

सेठ, डी. एल. (१९८४) : 'ग्रास-रूटस् इनिशिएटीव्हज इन इंडिया', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, फेब्रुवारी १४, पृ. २५९-२६२.

सेठी, हर्ष (१९८४) : 'ग्रुप्स् इन न्यू पॉलिटिक्स ऑफ ट्रान्स्फॉर्मेशन', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, १९, ८; फेब्रुवारी १८, पृ.३२६९.

[हा लेख लेखकाच्या 'पावर ऑफ द पीपल — पॉलिटिकल मुव्हमेंटस्, ग्रुप्स् अँड गॅरंटीड एंप्लॉयमेंट' या इंग्रजीतील मूळ अप्रकाशित लेखाचा अनुवाद आहे.]

**स.प्र.प.**

shaji.kalam@hotmail.com